भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक २६.०२.२०२० ते ०१.०३.२०२०)

| अंक १६/२०२० | दिनांक २५.०२.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१९/०२/२०२० ते २५/०२/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता २६/०२/२०२० ते ०१/०३/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९/०२ | २०/०२ | २१/०२ | २२/०२ | २३/०२ | २४/०२ | २५/०२ | दिनांक | २६/०२ | २७/०२ | २८/०२ | २९/०२ | ०१/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३८.० | ३८.० | ३८.० | ३८.० | ३८.५ | ३८.५ | ३८.० | कमाल तापमान (अं. से) | ३७ | ३८ | ३८ | ३७ | ३७ |
| १७.० | १७.५ | १८.० | १९.० | १८.० | १७.० | १८.० | किमान तापमान (अं. से) | १९ | १९ | १९ | १९ | १९ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ – मेघाच्छादन (ऑक्टा.) | ० | १ | २ | १ | १ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार – मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९१ | ९२ | ९१ | ९२ | ९० | ८६ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६८ | ७४ | ६७ | ६९ | ७२ |
| २५ | ३१ | २८ | ३१ | ४० | २७ | ४६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २४ | ३३ | ३२ | २७ | ३१ |
| १.८ | १.५ | १.४ | १.५ | १.६ | २.१ | १.५ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००९ | ००७ | ००६ | ००५ | ००३ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ – वा-याची दिशा | ईशान्ये कडून | पुर्वे कडून | पुर्वे कडून | ईशान्ये कडून | आग्नेये कडून |
| दक्षिण | दक्षिण | दक्षिण | स्थिर | पश्चिम | पश्चिम | पश्चिम | दुपार – वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या आठवड्यात तापमानात ब-याच अंशी वाढ होण्याची शक्यता असुन हवामान अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | फुलोरा ते फळधारणा | आंबा मोहोरावरील तुडतुड्यांच्या प्रादुर्भावावर नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही ९ मिलि प्रती १० लीटर पाण्यातुन फवारावे. तसेच २० ग्रम गंधक प्रती १० लीटर पाण्यातुन फवारावे.<br>आंबा मोहोरावर फुलकीडीचा (थ्रिप्स) प्रादुर्भाव आढळुन आल्यास अशा ठिकाणी फुलकिडींच्या नियंत्रणासाठी ४५ % स्पीनोसॅड २.५ मिलि प्रति १० लिटर पाण्यातुन संपुर्ण झाडावर फवारावे.<br>जिल्ह्यामध्ये कमाल तापमानात वाढ झालेली आहे तसेच दुपारची आद्रता कमी झालेली आहे. पुढील आठवड्यात कमाल तापमान वाढ संभवते तरी कातळावरील व जांभ्या खडकातील आंबा लागवडीमध्ये फळगळ टाळण्यासाठी १% कॅल्शिअम नायट्रेट्ची फवारणी करावी<br>येत्या आठवड्यामध्ये तापामानात वाढ होण्याचा अंदाज असुन आंबा फळगळ नियंत्रणासाठी, ऊत्पन्न वाढविण्यासाठी व फळाची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व सुपारीच्या आकाराची असताना १% पोटॅशियम नायट्रेट्ची तीन वेळा फवारणी करावी.<br>जिल्ह्यामध्ये कमाल तापमानात वाढ झालेली आहे तसेच दुपारची आद्रता कमी झालेली आहे. पुढील आठवड्यात कमाल तापमान वाढ संभवते. पाण्याची उपलब्धता असल्यास झाडांना विस्तारानुसार प्रती झाड १५०-२०० लि. पाणी १५ दिवसांच्या अंतराने द्यावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी जांभा जमिनीमधील आंबा कलमांना गवताचे आच्छादन द्यावे. झाडावरील सुकलेला मोहोर सकाळी १० ते संध्याकाळी ३ या वेळेत स्वच्छ करावा.<br>मोहोर फुलण्याच्या अवस्थेत शक्यतो किटकनाशकाच्या फवारण्या टाळाव्यात. जेणेकरुन त्याचा परपरागीभवनावर परिणाम होणार नाही.<br>आंबा पिकावर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असुन प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी ५ % हेक्झाकोनॅझोल ५ मिलि प्रती १० लिटर पाण्यात तसेच ८०% गंधक २० ग्रम प्रती १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>विद्यापीठाच्या शिफारशीनुसार मोहोरलेल्या झाडांना फळगळ कमी होऊन चांगली फळधारणा होण्यासाठी आम्रशक्ती या विद्राव्य अन्नद्रव्याची १ लि. प्रती १९ लि. पाणी या प्रमाणात फवारणी करावी. सदर २५ लि द्रावण हे चार मोहोरलेल्या झाडांसाठी वापरावे. |
| काजु | फळधारणा | काजुच्या झाडाला रोठा किड लागली असल्यास पाने पिवळी पडतात व खोडामधुन छिद्राद्वारे भुसा बाहेर पडलेला दिसतो. काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>काजुवरील बोंड व बी पोखरणा-या अळींच्या नियंत्रणासाठी डायक्लोरोव्हॉस ७६% प्रवाही १० मिलि प्रती १० लिटर पाण्यातुन फवारावे. |
| वायंगणी भात | फुटवे | जिल्ह्यामध्ये कमाल तापमानात वाढ झालेली आहे तसेच दुपारची आद्रता कमी झालेली आहे. पुढील आठवड्यात कमाल तापमान वाढ संभवते. पुर्नलागवड केलेल्या उन्हाळी भात शेतामध्ये सुरुवातीचे ८ ते १० दिवस पाण्याची पातळी २ ते ३ से.मी. ठेवावी. त्यानंतर ५ से.मी. पर्यंत वाढवावी.<br>भात पिकातील तण नियंत्रण करावे. लावणीनंतर एक महिना झालेल्या भात पिकास ४० कि. ग्रॅम प्रती हेक्टर (८७ कि.ग्रॅ. युरीया) याप्रमाणे नत्राचा पहिला हप्ता द्यावा. |
| भुईमुग | फुलोरा ते आरा | जिल्ह्यामध्ये कमाल तापमानात वाढ झालेली आहे तसेच दुपारची आद्रता कमी झालेली आहे. पुढील आठवड्यात कमाल तापमान वाढ संभवते. भुईमुग पिक काही ठिकाणी फुलोरा अवस्थेत असुन हळव्या जाती आरा अवस्थेत आहेत. तरी भुईमुगाच्या पिकावरुन रिकामे पिंप फिरवल्याने जमिनीत घुसणा-या आ-यांची परिणामतः शेंगांची संख्या वाढल्याने भुईमुगाचे ऊत्पन्न वाढते. |
| कुळीथ व चवळी | शेंगा | जिल्ह्यामध्ये कमाल तापमानात वाढ झालेली आहे तसेच दुपारची आद्रता कमी झालेली आहे. पुढील आठवड्यात कमाल तापमान वाढ संभवते. चवळी, कुळीथ इ. पीकांवर मावा व पाने पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी १५ मि.ली. डायमिथोएट प्रती १० लीटर पाण्यात मिसळुन फवारावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|